

. वाचनालय, ठाणे
विषय बाल वा
अ. क्र. १४६६
18-2-05





नेहरू बाल पुस्तकालय-१३

# मनीमावशीचा परिवार

मनोहरदास चतुर्वेदी

रूपांतरकार : डॉ. सुनील सुभेदार

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत ...
तसे न केल्यास घटना नियम ...
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी ...

IRBK-0114675

मर्जीमावशीच्या परिवारांत अनेक प्राण्यांचा समावेश होतो. पण आपल्या देशात आढळणाऱ्या वाघ, सिंह, बिबट्या आणि चित्ता यांसारख्या प्रमुख श्वापदाचांच समावेश या पुस्तकात केलेला आहे. या पुस्तकाचे मूळ लेखक कै. मनोहरदास चतुर्वेदी हे एक नामांकित शिकारी होऊन गेले. त्यांनी आपल्या देशातील छोट्या-मोठ्या मांजरींबरोबर उत्तर प्रदेशात सुमारे तीस वर्षे घालविली. आपल्या शिकारी अनुभवांवर त्यांनी हे पुस्तक 1968 साली लिहिले.

मार्च 1972 (चैत्र 1894)

© मनोहरदास चतुर्वेदी–1971

रु. 1·50

प्रकाशक : संचालक नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया ए–5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली 16; मुद्रक : मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगांव, मुंबई 4, आणि चित्रे व कव्हराची छपाई इंद्रप्रस्थ प्रेस (सी. बी. टी.) नेहरू हाऊस, 4 बहादुरशहा जफर मार्ग, नवी दिल्ली–1.

चित्रे

वाइल्ड लाइफ सोसायटी, सर्वश्री काशीनाथ, शेरजंग सिंह, देवनाथ आणि मारवाह यांच्या सौजन्याने.

वितरक

पॉप्युलर प्रकाशन, 35 सी, ताडदेव रोड, मुंबई 34 डब्लू. बी. आर.

१४६७५

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथालय शाखा.
दा. क्र १४६७५ दि. ..........
वि. वाङ्मय

# डहाण्या किंवा पटेरी वाघ

IRBK-0114675

वाघाची भीती कोणाला वाटत नाही? त्याचे नाव ऐकल्याबरोबर आपल्या अंगावर भयाने काटा उभा राहातो. वाघाविषयी अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. पण, खरे सांगायचे तर, वाघाविषयी आपल्याला फारशी माहिती नाही. वाघाचे हुबेहूब वर्णन क्वचितच कोणाला करता येईल. सिंह, केसरी, चित्ता, डहाण्या, बिबट्या आणि तरस इ० सर्व प्राण्यांसाठी लोक 'वाघ' हे सामान्य नाम वापरतात. अक्षरशत्रु खेडुतच नव्हे तर शहरांतले सुशिक्षितही ही चूक करतात.


वाघासारख्या जगप्रसिद्ध प्राण्याविषयी एवढे अज्ञान असावे याची अनेक कारणे आहेत. एक तर वाघांची संख्या फार कमी झालेली आहे आणि जे आहेत ते घनदाट अरण्यांच्या आश्रयाने राहातात. शिवाय वाघ आपल्या घळीतून क्वचितच बाहेर पडतो. त्यामुळे वाघ पाहण्याची संधी सहसा लाभत नाही. एक आकार वगळला तर प्रत्येकच बाबतीत वाघाचे, मांजरीशी साम्य आहे. घरातली 'म्याऊ–म्याऊ' करणारी मांजर ही लहान प्रमाणात का होईना, वाघाची जिवंत प्रतिकृती म्हणता येईल. तेच चपळ शरीर,

मांसल पंजे, मिशीचे ताठ पांढरे केस आणि खरखरीत जीभ! दोघांचेही डोळे, कान आणि नाक सारखेच तीक्ष्ण आहेत. दोघेही सारख्याच चोरपावलांनी वावरतात आणि रात्री धूर्तपणे शिकार करून दिवसा झोप काढतात. शरीर चाटून स्वच्छ ठेवावे आणि आपल्या भक्ष्यावर विजेसारखे तुटून पडावे—या सगळ्या गोष्टी अशा आहेत की जणू मांजरीनेच त्या वाघाला शिकविल्या. मांजरीला वाघाची मावशी म्हणतात, ते काय उगीच?

मांजरीने वाघाला सर्व विद्या शिकविल्या. फक्त झाडावर चढणे शिकविले नाही अशी दंतकथा आहे. पण ही दंतकथाच मानली पाहिजे. वाघाला आपल्या बिबट्या या भाऊबंदाप्रमाणे झाडावर सहज चढतां येत नसेल, पण प्रसंगच आला तर तो तेही करू शकतो. वाघ झाडावर चढल्याची पुष्कळ उदाहरणे आहेत. पूर आला असतांना वाघ झाडावर चढून बसलेला नेहमीच दिसतो.

वाघाचे रंगरूप आणि स्वभावधर्म यांचे विस्तृत ज्ञान करून घेण्यापूर्वी वाघ कोठे कोठे आढळतो हे जाणून घेतले पाहिजे. आफ्रिकेत सिंह, बिबळ्या इत्यादी अनेक हिंस्र श्वापदे असली तरी वाघ नसतो. उत्तर व दक्षिण अमेरिका, पश्चिम आशिया आणि ऑस्ट्रेलिया येथेही वाघ आढळत नाही. वाघ मुळचा उत्तर रशियातला असून तेथून तो पूर्वेकडे मांचूरिया, कोरिया, चीन, ब्रह्मदेश, सयाम, व्हिएटनाम, जावा, सुमात्रा आणि बाली बेटांपर्यंत पोचला असे मानले जाते. आपल्या जवळच्या लंका बेटावरही वाघ आढळत नाही. यावरून असा निष्कर्ष निघतो की वाघाचे येथे आगमन होण्यापूर्वीच लंकेचे द्वीपकल्प भरतखंडापासून तुटले असावे.

भारतात वाघ पूर्वेकडून ब्रह्मदेशातून आला आणि आसाम, बंगाल, हिमालयाच्या पायथ्याचा प्रदेश, मध्यभारत आणि तेथून दक्षिण भारत असा पसरत गेला. घनदाट अरण्ये, दऱ्या-खोरी, नदी नाल्यांचे तट आणि गुहा असलेल्या टेकड्या या सर्वच ठिकाणी वाघ आढळतो. हिमालयात 2400 ते 2700 मीटर उंचीपर्यंत वाघ पोहचू शकतो.



वाघाच्या रंगरूपावर आणि स्वभावधर्मावर भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव पडलेला आहे. वाघाच्या चार जाती प्रमुख आहेत :

1. मांचूरिया-कोरियाचा वाघ : हा सर्व वाघांत आकाराने मोठा व शक्तिमान असतो. थंडी आणि हिमवर्षाव यांपासून रक्षण व्हावे म्हणून निसर्गाने त्याला बरेच मोठे केस दिलेले आहेत. या केसांमुळे त्याचे पट्टे अस्पष्ट दिसतात.

2. कॅस्पियनचा समुद्री वाघ : कॅस्पियनचा समुद्र, कॉकेशस पर्वत आणि उत्तर इराणच्या या वाघाचे भारतीय वाघाशी बरेच साम्य असते. त्याचे केस छोटे आणि राठ असतात.

3. जावा-सुमात्राचा वाघ : जावा, सुमात्रा, बाली आणि इंडोनेशियातील इतर बेटांत राहणारा हा वाघ आकाराने लहान पण भारतीय वाघापेक्षा अधिक तजेलदार रंगाचा असतो. त्याच्या चेहऱ्यावरील पांढऱ्या रंगाचे प्रमाण इतर वाघांपेक्षा अधिक असते.

4. भारतीय वाघ : यालाच 'रॉयल बेंगॉल' टायगर म्हणतात. कारण, या वाघाची आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या इंग्रज शिकाऱ्याची गाठ प्रथम बंगालमधे पडली.

एक मांचूरियाचा वाघ वगळला तर इतर वाघांत फार फरक नसतो. मांचूरियातला गोठवणारा हिमवर्षाव, मध्यभारतातली पोळणारी काहिली, हिमालयातला घुमसटविणारा दमटपणा आणि आसाम किंवा केरळ येथील पावसाची संतत धार यांत सारख्याच आनंदाने राहू शकणारा वाघ हा एकमेव प्राणी आहे. उत्तराखंडातील बर्फ असो, पायथ्याची दलदल असो, सुंदरबनातील खारट पाणी असो किंवा आसामांतील मुसळधार पाऊस असो—वाघाला सगळे सारखेच.

वाघाचा रंग सोनेरी करडा असतो. पाठीच्या कण्यावरून पोटाच्या दोन्ही बाजूंना उभट काळे पट्टे असतात. हे पट्टे खाली उतरताना फिके होत जातात. या पट्ट्यांच्या छटा भुरकट काळ्यापासून काळ्या भोर रंगापर्यंत बदलत जातात. वाघाच्या पोटाचा



आणि छातीचा रंग शुभ्र असतो. वय वाढत जाते तसतसा पट्ट्यांचा रंग फिकट होत जातो, आणि त्यांतील अंतर वाढत जाते. काही वाघांच्या समोरच्या शरीरावर पट्टे कमी असतात.

लहाणपणी वाघाचे केस झबरे आणि फिक्या रंगाचे असतात. तारुण्यात रंग गडद होत जातो. मादीचा रंग नरापेक्षा नेहमीच अधिक तकाकतो. हिवाळ्यात त्याच्या त्वचेवर राठ केस येतात आणि रंग गडद होतो. उन्हाळ्यात केस झडतात. आणि

रंग फिकट होतो. मिशीवरील केस पांढरे आणि ताठ असतात. कानांमागील भाग काळा असतो व त्यावर मध्यभागी पांढरा ठिपका असतो.

वाघाचा रंग आणि पट्टे अरण्यांतील पार्श्वभूमीशी इतके एकजीव होतात की तो आपल्याला सहज लपवू शकतो. उन्हाळ्यात तर वाळलेली पाने आणि काळ्या वाळक्या फांद्या यांच्याशी त्याचे साम्य विलक्षणच असचे. त्यामुळेच तो सहजासहजी कोणाच्या दृष्टीला पडत नाही. मी एकदा मुस्तफाबाद जवळील पीलीभीतच्या जंगलात जखमी वाघ शोधीत होतो. आम्ही चौघे मित्र हत्तीवर बसलेलो होतो व चौघांचीही नजर वाघ शोधीत होती. पण आम्हाला वाघ दिसला तो झाडीतून उडी मारून हत्तीच्या मस्तकावर येऊन ठेपल्यावरच !

मध्यप्रदेशात रीवा या शहराजवळ पांढऱ्या रंगाची वाघांची जात आढळते, या वाघाचे शरीर मातकट पांढरे असते आणि पट्टे काथाच्या रंगाचे असतात.

मांजर आणि बिबट्या दोघेही पाण्यापाशी जायचे टाळतात. पण वाघ मात्र उन्हाळ्यात आनंदाने जलविहार करतो. वाघ शारदा नदी ओलांडून नेहमीच आमच्या अरण्यात येतात.

मांजरीचा सर्वच परिवार स्वच्छतेसाठी प्रसिद्ध आहे. वाघ आपले शरीर स्वच्छ ठेवतो पण तरीही त्याला विशिष्ट प्रकारचा उग्र वास येतो. हा वास थोडा मंद असता तर वाघाला शिकारीला सोपे झाले असते. मांजरीप्रमाणेच वाघही आपली नखे तळव्याच्या मांसल भागात ओढून ठेवतो, आणि कधी कधी झाडावर परजून त्यांना अणकुचीदार बनवितो. मलमूत्रादी विधी केला की वाघ त्यावर पंजाने माती टाकतो.

वाघाचे कान फारच तिखट असतात. अगदी अस्पष्ट आवाजही तो फार अंतरावरून ऐकतो. मारून लपविलेले भक्ष्य तसेच सोडून तो उपाशी निघून जातो, पण थोडासाही कानोसा आल्यावर तिकडे फिरकत नाही, पुस्तकाचे पान उलटण्याची फडफडही त्याला ऐकू येते, दौली येथे एक वाघ दोन रात्री



मचानाजवळ आला नाही. कारण शिकारी साहेब मचानावर बसून पुस्तक वाचीत होते!

वाघाचे डोळे दिवसा मिटलेले असतात. दिवसभर तो बहुधा झोपलेलाच असतो. सूर्य मावळल्यावर वाघ झोपेतून उठतो, त्या वेळी त्याचे मोठे काळे डोळे असे उघडतात की बुबुळांचे वर्तुळ स्पष्ट दिसावे, त्याला रात्री उत्तम दिसते. त्याच्या डोळ्यांवर रात्री प्रकाश पडला तर ते लाल स्फुल्लिंगासारखे दिसू लागतात.

वाघाचे घ्राणेंद्रिय कुत्रा, कोल्हा किंवा लांडगा यांच्याइतके तीक्ष्ण नसते. पण तो

अंधारात लपविलेले भक्ष्य निव्वळ वासावरून हुडकून काढू शकतो.

वाघ लपून छपून शिकार करतो. नर किंवा मादी एकमेकांना साद घालतानाच फक्त गर्जना करतात. आपल्या छाव्यांना जेवावयाला बोलविण्यासाठीही मादी गर्जना करते. वाघाला उच्चासनाचे आकर्षण असते. तो कोठेही असो, उच्चासनावर जाऊन बसतो. हिवाळ्यात उंच टेकड्यांवर ऊन खात पहुडतो. उन्हाळ्यात त्याचे वास्तव्य नाल्याकाठी असते.



वाघ वस्तुतः शांतिप्रिय प्राणी आहे. तो प्रकाश, गर्दी आणि गोंगाट यांपासून दूर राहातो. आजपर्यंत कोणत्याही वाघाने निष्कारण माणसावर कधी हल्ला केलेला नाही. उगीचच भांडण उकरून काढणे त्याच्या स्वभावात नाही. जखमी वाघ किंवा छावे सोबत असलेल्या वाघिणीची गोष्ट अर्थातच निराळी. वाघीण आपल्या छाव्यांजवळ कोणालाही फिरकू देत नाही.

नित्याच्या आयुष्यात वाघ कोल्ह्यापेक्षाही भेकड असतो असे अनेक शिकाऱ्यांचे मत आहे. जखमी झाल्यावरच त्याचे वाघपण जागे होते व तो शौर्य गाजवतो.

एरवी धनगराची मुलेही आरडा-ओरडा करून त्याला घाबरवून सोडतात आणि



आपल्या गुरांचे रक्षण करतात. रानात वाघाला पाहताच सर्व प्राणी इतका आरडा-ओरडा करतात की वाघाला पळ काढावाच लागतो. चितळ, सांबर, माकड, जंगली कोंबडी, मोर, तऱ्हेतऱ्हेच्या चिमण्या, कोल्हे—ही सारीच असा काही आक्रोश करून

आसमंत डोक्यावर घेतात की साऱ्या अरण्याला जाग येते. रानडुक्कर तर वाघाशी सामना देखील करतो. म्हैस मात्र बहुधा वाघाच्या पंजातून आपली सुटका करून घेऊन पळ काढते.

वाघ सामान्यतः प्रकाश आणि अग्नी यांना भीत असला तरी नरभक्षक वाघ मात्र भक्ष्य मिळवण्याच्या आशेने त्यांच्याकडे मोर्चा वळवितो, तो लपत छपत धिम्या गतीने चालतो. चालताना त्याचा पूर्ण पंजा टेकत नाही, तर बोटांचा आधार पुरे होतो. तो पावलागणिक मीटरभर अंतर कापतो आणि कधी कधी त्याच्या पुढल्या पंजावर मागचा पंजा अशा रीतीने पडतो की जणू दोन पायांचा प्राणीच चालत गेला असे ठसे पाहिल्यावर वाटावे. त्याच्या पुढच्या पंजात पाच आणि मागच्या पंजात चार बोटे असतात. त्याचे पुढचे पाय मागच्या पायांपेक्षा लहान असतात. त्याला शोधण्याच्या कामी त्याच्या पावलांच्या ठशांचा फार उपयोग होतो. त्याच्या पुढच्या पायांचा पंजा मोठा आणि वजनी असतो. पावलांच्या ठशावरून वाघाचा आकार आणि तो नर आहे किंवा मादी याचे ज्ञान चटकन होऊ शकते. वाघाची उत्सुकता जागृत झाली की त्याची शेपटी डावीकडून उजवीकडे झुलते पण संताप किंवा आनंद झाला असेल तर ती ताठ उभी राहाते.

वाघ मांसाहारी श्वापद आहे. त्याला मांस हवे, मग ते कोणाचेही असो, कसेही असो. त्याला मांसाशिवाय दुसरे काही चालत नाही. तो औषध म्हणून हिरवे गवत खातो, एवढाच काय तो अपवाद. वाघ फक्त स्वतः केलेली शिकारच खातो, हे काही लोकांचे मत चुकीचे आहे. शिकार कोणी का केलेली असेना ती खायला वाघाला संकोच वाटत नाही. त्याचप्रमाणे एखाद्या प्राण्याचे प्रेत सडून त्यात किडे वळवळत असले तरीही तो ते उदरस्थ करतो.

भुकेची वेळ झाल्यावर वाघाला जंगलातला कोणताही प्राणी चालतो. त्याला भीती वाटते ती फक्त जंगली कुत्र्यांच्या झुंडीची, तसा तो कोल्ह्यांनाही घाबरतो. आयते मांस खायला मिळेल या आशेने आपला जथ्था सोडून कोल्हा नेहमीच वाघाच्या

मागावर असतो. भुकेला वाघ कांहीही खातो. पूर आलेला असताना कासव, बेडूक आणि मासळ्यांवरही तो गुजराण करतो. दुसरा वाघ खायचीही त्याची तयारी असते. नर तर आपल्या अपत्यांनाही खाऊन टाकतो. त्यामुळे वाघीण छाव्यांना वडिलांपासून लपवून ठेवते.

वाघाने केलेली शिकार इतर प्राणी खात नाहीत या समजुतीतही तथ्य नाही. संधी मिळाली तर अरण्यातले सर्वच प्राणी वाघाने केलेली शिकार फस्त करतात. वाघ आपली शिकार एकाच ठिकाणी दोनदा खात नाही, पहिल्या रात्री खाऊन झाले की उरलेले मांस तो दुसऱ्या ठिकाणी दडवतो. तो एका वेळी पंचवीस ते तीस किलो मांस खातो.

वाघ कोणताही प्राणी उडी मारून ठार करीत नाही. तर, हळू हळू शक्य तितके जवळ जावे आणि एकदम झडप घालून नरडीचा घोट घ्यावा, हे त्याचे तंत्र असते. खाण्याच्या बाबतींत वाघाइतका नीटनेटका आणि स्वच्छतेची चाड असलेला प्राणी दुसरा नाही, तो पहिल्यांदा जांघेला तोंड लावतो व केस, कातडी, मांस आणि हाडे सर्वच फस्त करतो. आतड्यांचा घाणेरडा भाग तो मोठ्या कौशल्याने काढून टाकतो.

वाघ शिकारीला एकटाच निघतो. अरण्याच्या एका भागात सामान्यतः एकच वाघ राहातो. भूक नसेल तर निष्कारण कोणत्याही प्राण्याला तो मारीत नाही. त्याला महिन्यातून तीन चार वेळा शिकार करावी लागते.

माणसाची उंची, कपडेलत्ते आणि दोन पाय यांची वाघाला स्वाभाविक भीती वाटते. पण कधी कधी तो माणूसही मारून खाऊ लागतो. म्हातारा, दुबळा आणि जखमी वाघ रानटी प्राण्यांना सहज पकडू शकत नाही. अशा परिस्थितीत त्याच्या तावडीत माणूस सापडला तर आपल्या शिकारीचा ढंग बदलून तो माणूसच मारून खाऊ लागतो. नरभक्षक वाघ, गाई-म्हशी सोडून देऊन धनगरांनाच उचलून घेऊन जातो. नरभक्षक वाघीण आपल्या छाव्यांनाही माणसाच्या रक्ताची चटक लावते.



वाघ माणसाचे मुंडके खात नाही. कधी कधी वाघाला कुत्र्याप्रमाणे वेड लागते. त्याला 'रेबीज' नावाचा रोग झाला तर काही तासांतच तो अनेक माणसांवर हल्ला करतो.

नरभक्षक वाघाला माणसाच्या जीवनपद्धतीचे उत्तम ज्ञान असते. वाटसरूंना झडप घालून पकडणे, घरात घुसून माणसाला चुपचाप उचलून नेणे, दहा-वीस निजलेल्या माणसांतून एकाला चाहूल न लागू देता गुपचूप ओढून नेणे हे त्याला सहज साधते. नरभक्षक वाघ कपटीपणाने पाठीमागून अचानक हल्ला करतो.

वाघाच्या लांबीविषयी नेहमीच अतिशयोक्ती करण्यात येते. शिकारी रंगात येऊन आत्मप्रौढी करू लागला की आपण मारलेल्या वाघाच्या लांबीत एक-दोन मीटरची भर सहज टाकतो. जुन्या काळी एखाद्या राजा महाराजांनी शिकार केलेली असेल तर राजेसाहेबांना खूश करण्यासाठी नोकरचाकर अवाच्या सव्वा लांबी जाहीर करीत. मोजण्याची टेप ओढावी, चुकीची लावावी किंवा तिचे आठ-नऊ इंच कापून टाकावेत. हा प्रघात सर्वत्र रूढ होता. साडे पाच ते सहा मीटर लांबीच्या वाघाला ठार केल्याचा दावा करणारेही लोक आहेत. वस्तुतः वाघाची सरासरी लांबी सव्वातीन मीटर असते.* यात शेपटीच्या लांबीचाही समावेश आहे. शेपटी सामान्यतः एक मीटर लांब असते. वाघीण वाघापेक्षा लांबीत एक तृतीयांशाने कमी भरते. नराची उंची जास्तीत जास्त 105 सेंटिमीटर आणि वजन सुमारे 290 किलो भरते.

वाघीण सुमारे शंभर दिवस गर्भ धारण करते आणि एका वेळी सामान्यतः तीन छावे विते. नवजात छाव्याचे वजम सुमारे सव्वा किलो असते. वाघीण छाव्यांना कडेकपारीत, गुहांत किंवा झाडांच्या ढोलीत लपविते, मानेवरील त्वचा तोंडात धरून ती त्यांचे स्थानांतर करते.

* हेच वाघाचे 'खुंटी–माप' आहे. कोणत्याही प्राण्याची लांबी मोजण्याची हीच योग्य पद्धत आहे. मेलेला प्राणी जमिनीवर सरळ निजवून एक खुंटी त्याच्या नाकाजवळ आणि दुसरी ताणलेल्या शेपटीच्या टोकावर ठोकतात. नंतर या दोन खुंट्यांतील अंतर मोजतात.





वाघीण कोणालाही आपल्या छाव्यांजवळ फिरकू देत नाही. छाव्यांचे डोळे नवव्या दिवशी उघडतात. पण दोन आठवडे त्यांना नीट दिसत नाही. छावे आपल्या आईबरोबर बराच काळ राहतात. पुन्हा विण्याची वेळ आली की वाघीण आपल्या छाव्यांचा निरोप घेते. वाघिणीला दर तीन वर्षांनी अपत्यसंभव होतो, असे शिकारी सांगतात. आईच वाघांना शिकारीचे तंत्र शिकविते. वाघाची वाढ पाचव्या वर्षांपर्यंत होते.

वाघाच्या शिकारीची गणना अत्यंत धाडसी खेळांत केली जाते. जुन्या काळी लोक वाघाला बाण, भाले आणि तलवार यांनी मारीत असत. आदिवासी लोक खड्ड्यांवर गवत पसरून वाघ पकडीत, वाघाला पकडण्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे सापळे शोधून काढले जात. कधी कधी वाघाला फसवून लोखंडी पिंजऱ्यात अडकवीत आणि भाल्यांनी भोसकून ठार करीत, विष देऊन वाघ मारण्याची पद्धतही काही ठिकाणी होती. सुंदर-बनातील झाडे मचान बांधण्याइतकी उंच नसतात. त्यामुळे तेथे शिकारी स्वतःच लोखंडी पिंजऱ्यात बसून आत्मरक्षण करीत आणि टिपण साधीत.

बंदूक आणि रायफल प्रचारात आल्यापासून वाघाच्या शिकारीचे तंत्रच बदलले आहे. वाघाच्या पावलाच्या खुणा अधिक प्रमाणात असतील अशा

ठिकाणी संध्याकाळच्या सुमारास शिकारी रेडकू बांधून ठेवतात. दोरीचे एक टोक झाडाला किंवा खुंटाला आणि दुसरे रेडकाच्या पायाला बांधतात. वाघ जर रात्रीं त्या रस्त्याने आला तर रेडकू मारून आजूबाजूच्या झाडीत ओढून घेऊन जातो, त्याला लपण्याइतकी दाट झाडी असेल, तर तो तेथेच थांबतो. दुसऱ्या दिवशी हाकारे एवढा गोंधळ करतात की वाघ उघड्यावर येतो. दरम्यानच्या काळात शिकारी बंदुकीसह मचानावर पोचलेले असतातच, वाघ बंदुकीच्या टप्प्यात आला की टिपला जातो.

वाघ हेरण्यासाठी हत्तीवरून पाहणी करणे सगळ्यात चांगले. मात्र या कामासाठी शिकवलेला हत्ती लागतो. काही शिकाऱ्यांना मचानाऐवजी झाकलेला खड्डा अधिक पसंत पडतो. हाकारा माणसे करतात किंवा हेच काम हत्तींकडून घेतले जाते. वाघ मचानाच्या दिशेने हाकलला जातो. वाघाला पांढऱ्या रंगाची भीती वाटते. त्यामुळे विशिष्ट मार्गाने त्याने जाऊ नये असे वाटत असेल, तर त्या मार्गावर पांढरी चादर बांधली जाते किंवा पांढरा कागद चिकटविला की काम भागते. हाकाऱ्याचा अनुभव ज्या वाघांना असतो, ते नेमके उलट्या दिशेला वळून आपला बचाव करतात. कधी कधी शिकारी हत्तीचाच चालत्या फिरत्या मचानासारखा उपयोग करतात. नेपाळात चार पाचशे हत्तींनी घेरून वाघाची शिकार केली जाते. याला 'रिंग–वे' म्हणतात.


वाघाच्या शिकारीत फार सावधगिरी बाळगावी लागते. हाकारा सुरू झाल्याबरोबर जंगलातून तऱ्हेतऱ्हेचे प्राणी निघू लागतात. त्यांच्या मागोमाग वाघ येतो. एका हाकाऱ्यात सामान्यतः एकच वाघ निघतो. पण अधिक वाघ निघाल्याचीही उदाहरणे आहेत. धावत्या वाघावर गोळी झाडली तर तो जखमी होऊन शिकाऱ्याचे प्राण धोक्यात टाकतो. गोळी लागल्याबरोबर वाघ गर्जना करतो. मचान सामान्यतः चार मीटरपेक्षा अधिक उंचीवर बांधले जाते; व ते पानांनी उत्तम प्रकारे झाकले जाते. जमिनीवर उभे राहून समोरासमोर वाघाची शिकार करणे फार धोक्याचे असते.



वाघ मुळात शांतिप्रिय असला आणि निष्कारण झगड्यात पडण्याची त्याची प्रवृत्ती नसली तरी जखमी झाल्यावर मात्र तो वाटेल ते करू शकतो. जखमी वाघ झाडीत दबा धरून बसतो आणि संधी आल्याबरोबर हल्ला करतो. अशावेळी तो हत्तीवर किंवा मचानावरही उडी मारण्यास मागेपुढे पाहत नाही.

एकदा एक इंजिनियरसाहेब हत्तीवरून जखमी वाघ शोधीत होते. वाघाने एकाएकी हत्तीवर हल्ला केला. हत्ती बिचकून असा पडला की इंजिनियरसाहेब सरळ वाघाच्या पाठीवर आरूढ झाले! हत्ती तर चटकन उठून पळून गेला पण वाघाने इंजिनियरसाहेबांचा खांदा जबड्यांत धरून त्यांना जंगलाच्या दिशेने ओढत न्यावयाला सुरुवात केली थोडे अंतर ओढल्यावर दम घेण्यासाठी वाघ थांबत असे. पण साहेबांनी थोडीशी जरी हालचाल केली तरी तो मांजरीप्रमाणे पंजा मारी. त्यांना अरण्यात ओढून आणल्यावर वाघ इतका जवळ बसला की त्याच्या काळजाचे ठोके इंजिनियरसाहेबांना ऐकू येऊ लागले. मृत्यूच्या सान्निध्यांत इंजिनियरसाहेब शारीरिक वेदना विसरले. त्यांना कमरेशी बांधलेल्या पिस्तुलाची आठवण झाली, पण थोडी हालचाल केली तरी वाघाचा पंजा बसेल ही भीती होतीच. अखेर धैर्य करून त्यांनी पिस्तूल काढले. वाघ गुरकावला, पण त्याचे तोंड दुसरीकडे होते. त्याच्या हृदयाशी पिस्तुल भिडवून साहेबांनी दोन गोळ्या झाडल्या. त्या वर्मी बसल्याबरोबर वाघाने कानठळ्या बसतील अशी गर्जना केली, एवढेच इंजिनियरसाहेबांना आठवते. कारण त्यांना नंतर शुद्ध आली ती एकदम इस्पितळातच !

जखमी वाघ जर हत्तीला किंवा माणसाला भिडला असेल तर त्यावर कधी गोळी झाडू नये. कारण, तो आपली जागा इतकी झटकन बदलतो की गोळी बहुधा माणसाला किंवा हत्तीलाच लागते. अशा संकटात वाघाला पळवून लावण्याचा एकच उपाय असतो. तो म्हणजे हवेत गोळीबार करणे, त्या आवाजाला घाबरून वाघ नेहमीच पळ काढतो. वाघाने जखमी केलेली माणसे क्वचितच वाचतात. त्याने बोचकारले तरी विषबाधा होते.




ऑबझर्वेशन टॉवर, गीर

गोळी लागल्यावर वाघ कधी कधी बेशुद्ध होऊन पडतो. अशा प्रसंगी तो मेला असे वाटल्यामुळे अनेक शिकाऱ्यांनी आपले प्राण गमावलेले आहेत.

कधी कधी जखमी वाघ भर वस्तीत येण्याचेही धाडस दाखवितात. एकदा कुरनूलच्या जंगलातील एक वाघीण संध्याकाळी श्री. वेंकटरमण अय्यर यांच्या बंगल्यात आली आणि सरळ त्यांच्या खोलीतील मेजाखाली जाऊन बसली. ते खुर्चीवर बसून काम करू लागले तेव्हा त्यांचा पाय वाघिणीवर पडला. भेदरलेले अय्यरसाहेब खोली-बाहेर आले. त्या वेळी त्यांच्यावर कोणाचा विश्वास बसे ना! नंतर ती वाघीण ठार

बाजूच्या चित्रातील × या खुणेजवळ वाघ लपलेला आहे.





करण्यात आली. तिचे कातडे काढताना असे ध्यानात आले की जखमी झालेली होती आणि तिच्या जखमा चिघळल्या होत्या.

माणसाने जर हालचाल केली नाही तर वाघाला माणूस ओळखता येत नाही. माणूस श्वास रोखून उभा राहिला तर तो वाघाला दिसतही नाही. हत्ती, उंट, गाडी किंवा मोटारीत बसलेला माणूस वाघाच्या ध्यानात येत नाही. माणसाला पाहून, इतर प्राण्यांप्रमाणेच, वाघही गोंधळतो असा अनेकांचे मत आहे.

एकदा सहारनपूर जवळच्या जंगलात मी माझे शिकारी मित्र दिलीपसिंह यांच्या बरोबर एका टेकडीवर बसून वाघाची वाट पाहात होतो. खालच्या नाल्यांत वाघाच्या पंजाच्या खुणा होत्या. त्याच मार्गाने वाघ परतेल असा आमचा अंदाज होता. पण थोड्या वेळाने पाहातो तो वाघ टेकडीवर आम्हा दोघांच्या डोक्याशी येऊन उभा राहिलेला होता! पण त्याचे तोंड दुसरीकडे होते आणि शेपटी आमच्या बाजूला होती. त्याने शेपटीला हेलकावा दिला त्या वेळी ती दिलीपसिंहाच्या फेट्याला जाऊन लागली! वाघ दुसऱ्या बाजूने खाली उतरून गेला. पण ती दोन मिनिटे आम्हाला युगासारखी वाटली.

वाघाचे कातडे, मिशा, दात, नखे, मांस आणि चरबी ही सर्वच कोणत्या ना कोणत्या कामी येतात. वाघाचे मांस खाल्ल्याने माणूस त्याच्या सारखाच शूरवीर होतो असा अनेकांचा विश्वास आहे. वाघाची नखे सोन्या चांदीत गाठवून ताइता-सारखी घालतात. वाघाच्या खांद्याशी तीन-चार इंचाचे 'संतोष हाड' असते. इंग्रज लोक त्याला 'लकी बोन' म्हणतात, आणि ते सोन्यात गाठवून घालतात. वाघाचे कातडे अनेक वर्षे टिकते, व त्याचा आसनासाठी उपयोग होतो. त्याच्या चरबीने सांधेदुखी बरी होते असे म्हणतात. वाघिणीच्या दुधाने अनेक नेत्ररोग हमखास बरे होतात अशी समजूत आहे.

आमच्या देशात आता फार थोडे वाघ शिल्लक राहिले आहेत. त्यांची संख्या सतत रोडावते आहे. म्हणूनच अनेक ठिकाणी वाघाच्या शिकारीला प्रतिबंध करण्यात

आलेला आहे. जंगल तोडण्याचे आणि ज्या प्राण्यांवर वाघाचे जीवन अवलंबून आहे त्या प्राण्यांची हत्या करण्याचे थांबले नाही तर वाघ थोड्याच दिवसांचा पाहुणा ठरेल.



# सिंह

सिंह आणि वाघ यांत खूप फरक आहे. सिंहाचा आकार वाघापेक्षा लहान असतो, त्याच्या अंगावर पट्टे नसतात व त्याचा रंग पिवळसर असतो. त्याची शेपटी लहान आणि झुपकेदार असते. नराच्या गळ्याभोवती आयाळ असते, त्याची लांबी सव्वा दोन ते सव्वा तीन मीटर, खांद्याची उंची सुमारे मीटरभर आणि वजन 180 ते 225 किलोपर्यंत भरते. सिंह वाघासारखा भयप्रद नसतो.

आमच्या देशात सिंहाला केसरी, केहरी, हरि, बबरशेर अशी अनेक नावे आहेत. प्राचीन काळी सिंह उत्तर आणि मध्य भारतातील मैदानात विपुल प्रमाणात आढळत असे; म्हणून तो सर्वांच्या चांगलाच ओळखीचा होता, वेदांत, शास्त्रीय ग्रंथांत आणि इतर साहित्यांत सिंहाचे अनेक संदर्भ येतात. दुर्गेचे वाहन सिंहच आहे. तो शक्ती आणि शौर्य यांचे प्रतीक मानला जातो. म्हणूनच रजपूत आणि शीख आपल्या नावामागे 'सिंह' ही उपाधी लावतात. सिंहाला भारताचा राष्ट्रीय पशू म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. सम्राट अशोकाने उभारलेल्या स्तंभावरील चार

संग्रहालय,

सिंहांना भारताने आपले राजचिन्ह केले असून त्याखाली 'सत्यमेव जयते' हे ब्रीदवाक्य लिहिलेले आहे.

तथापि, आता आपल्या देशातून सिंहाचा जवळ जवळ अस्त झालेला आहे. काही मोजके सिंह जुनागडजवळील गीरच्या जंगलात शिल्लक राहिलेले आहेत. आपल्याकडे आता सिंहाच्या शिकारीला मज्जाव आहे. जुन्या काळी देखील







राजघराण्यांनाच सिंहाच्या शिकारीचा अधिकार असे.

पूर्वी सिंह संपूर्ण आफ्रिका खंड, पश्चिम आशिया आणि आग्नेय युरोपात आढळत असे. पण दोनशे वर्षांपूर्वी बंदूक आणि रायफल यांचा शोध लागला तेव्हापासून सिंहांची संख्या कमी होत गेली.

डहाण्या किंवा पटेरी वाघ भारतात ईशान्येकडून आला आणि सिंह वायव्येकडून आला असावा असे वाटते. तो अफगाणिस्ताना ऐवजी सीरिया, इराण, इराक, बलुचिस्तान आणि सिंध अशा मार्गाने आला. शिकंदराची फौज भारतातून याच मार्गाने परत गेली होती आणि तिचे सिंहानी फार लचके तोडले होते. लंकेपर्यंत सिंह किंवा पटेरी वाघ दोघेही पोहचू शकलेले नाहीत.

सिंह मोकळ्या मैदानात वावरतो. हरीण, नीलगाय, काळवीट आणि चिंकारा ज्या दऱ्या खोऱ्यांत राहातात तेथेच एके काळी सिंहाचे वास्तव्य होते. त्यामुळेच सिंह परदेशातून आला की नाही हे सांगणे कठीण आहे, एक तर तो मुळचा भारतातला असावा किंवा आफ्रिकेतल्या मैदानातला. सिंह वाघाप्रमाणे नजर चुकवीत नाही. आपण वनराज आहोत या रुबाबात वावरतो. तो कधी एकटा राहात नाही, तर राजाबरोबर लवाजमा असावा तसा सगळा परिवार बरोबर घेऊन फिरतो.

म. प्र. मं. ठाणे. वाचनालय शाखा.
क्र. १५६४४
वि. ...


बहुधा नर आणि मादी मिळून शिकार करतात. एकाने शिकारीचे टिपण साधण्यासाठी दबा धरून बसावे आणि दुसऱ्याने शिकार हुसकून खदेडावी असे त्यांचे साहचर्य असते.

पटेरी वाघ आपल्या ठार मारून लपविलेल्या भक्ष्याच्या दिशेने दबकत जातो व थोडीशी जरी चाहूल लागली तरी उपाशी परततो. पण सिंह अशी काळजी घेत नाही. दिवस मावळल्यावर तो आपल्या भक्ष्याच्या जागी मुलाबाळांसह येतो. त्यामुळेच सिंहाला मारणे कठीण जात नाही. आपल्या या अहंकारी राजन्य वृत्तीपायी सिंहाने आपला नाश ओढवून घेतलेला आहे.




वाघाप्रमाणेच सिंहही सर्वभक्षक आहे. गाय, बैल, म्हैस, हरीण–कोणताही प्राणी तावडीत सापडो, सिंहाने त्याचा फन्ना उडवलाच. त्याला खायला मांस हवे–मग ते कोणत्याही प्राण्याचे असो, ताजे असो की सडलेले असो–त्याला सर्व सारखेच. एका वेळी तो अख्खी गाय फस्त करू शकतो.

वाघाप्रमाणे सिंह झाड टाळीत नाही. कारण तो सहजगत्या झाडावर चढू शकतो. ज्ञानेंद्रियांत त्याचे कान सर्वाधिक तीक्ष्ण असतात. त्यानंतर दृष्टी. सर्वांत दुर्बळ त्याचे घ्राणेंद्रिय असते. एका अर्थी सिंह हा गरीब प्राणी आहे, आणि तो चटकन माणसाळतो. त्यामुळेच सर्कशीसाठी वाघापेक्षा सिंह अधिक पसंत केले जातात.




मोकळ्या मैदानात माणूस पाहाण्याची सिंहाला सवय असल्यामुळे त्याला माणसांची भीती वाटत नाही. वाघाला माणसाचा आकार आणि रूप यांचे भय वाटते आणि जखमी झाला तरच तो माणसावर हल्ला करतो. कधी छावे बरोबर असले तर वाघीण माणसावर झडप घालते पण त्यास ठार मारण्यासाठी नव्हे तर हाकून लावण्यासाठी. सिंहाच्या बाबतीत मात्र असे नसते. सिंह सहज नरभक्षक होतो. जंगली प्राणी मिळाले नाहीत तर गुरं आणि गुरं कमी पडली तर माणसं खायला तो सहजच चटावतो.

सिंहासंबंधी माझी एक रोमांचकारी आठवण आहे. एकदा गीरच्या जंगलात सिंहाचे छायाचित्र काढण्यासाठी हळूहळू



चालत मी त्याच्या अगदी जवळ जाऊन पोहोचलो. मारलेला बैल खाण्यात तो दंग होता. सिंहाने आपले तोंड लचका तोडण्यासाठी बैलाला लावले की दर वेळी मी एक पाऊल पुढे जात असे. अचानक माझा पाय एका वाळक्या काटकीवर पडला. काटकी तुटल्याचा आवाज झाल्याबरोबर सिंह खाणे सोडून एकदम उभा राहिला. माझ्याकडे हिंस्रपणे पाहात तो शेपटी हलवीत होता. आता पळणे हे मृत्यूला निमंत्रणच झाले असते. मी पुतळ्यासारखा स्तब्ध होऊन तेथेच उभा राहिलो. कॅमेरा माझ्या हातात होता आणि माझा चेहरा कॅमेऱ्याआड दडलेला होता. त्यामुळे सिंह गोंधळला आणि बारकाईने पाहाता यावे म्हणून



शेपटीला हेलकावे देत माझ्या दिशेने निघाला. कदाचित अजाणता माझी थोडी हालचाल झाली असेल. त्याचे शेपूट ताठ उभे राहिले. त्याची झडप माझ्यावर पडण्यापूर्वीच सडकेवर उभ्या असलेल्या जीपमधील माझा मित्राने जोरात हाक मारून म्हटले, "अरे धाव, सिंहाच्या तावडीत सापडशील !"

अरण्यातल्या नीरवतेत तो आवाज मोठ्याने दुमदुमला आणि सिंहाने मला तेथेच सोडून जीपकडे धाव घेतली. तिथल्या लोकांनी हवेत बंदुकीचे बार काढून त्याला पळवून लावले. मी होतो तिथेच मटकन् खाली बसलो आणि बऱ्याच वेळाने अडखळत कसाबसा जीपजवळ पोचलो. ही घटना आठवली की आजही माझ्या अंगावर भीतीचा



काटा उभा राहातो. कदाचित ही कथा लिहिता यावी म्हणूनच त्या सिंहाने मला सोडून दिले असावे !

एका सिंहाबरोबर सामान्यतः दोन ते तीन सिंहिणी असतात. छावे मातेच्या गर्भात 92 ते 113 दिवस राहतात. सिंहिणीला एका वेळी तीन ते चार आणि कधी कधी सहा छावे होतात. सिंहाची आयुमर्यादा पंचवीस ते तीस वर्षे असते. वाघ आणि सिंह एकाच रानात राहू शकत नाहीत अशी समजूत आहे. ही समजूत या अर्थाने बरोबर आहे की सिंह मोकळ्या मैदानात राहतो तर वाघ घनदाट अरण्यात. दुसरीही अशी एक समजूत आहे की वाघाच्या अरण्यात सिंहाला सोडले तर ते दोघे एकमेकाला फाडून खातील. हे मात्र खरे नाही, वाघ कधीही कोणाशी भांडण उकरून काढत नाही. एकदा अल्वरच्या महाराजांनी वाघ आणि सिंह यांची लढाई घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. वाघ सुरुवातीला लढेचना. आणि जबरदस्तीने लढायला भाग पाडले तर मागच्या पायांत शेपटी घालून त्याने सरळ पळ काढला !

वाघ व सिंह यांचे एकमेकांशी का भांडण व्हावे हे काही समजत नाही. एका मादीसाठी दोन वाघ एकमेकांशी लढू शकतील किंवा दोन सिंह एकमेकांना ठार करू शकतील. पण निष्कारण वाघसिंहांनी आपापसांत लढणे अशक्य आहे. अशाच तऱ्हेच्या कित्येक आख्यायिका या प्राण्यांबद्दल प्रसिद्ध आहेत. पण पडताळून पहिल्यावर खऱ्या नसल्याचे आढळले.

सिंहाची भारतात पुनश्च वसाहत करण्याचे पुष्कळ प्रयत्न झालेले आहेत. परदेशांतील सिंह आणून खुल्या मैदानांत सोडले गेले. पण मैदानांतील दऱ्याखोऱ्यांचे क्षेत्र लहान असते आणि त्यात त्यांना पुरेशी शिकार मिळत नाही, त्यामुळे भोवतालच्या वसाहतीतील पाळीव प्राणी किंवा माणूस यांच्याकडे त्यांचे लक्ष वळते.

एकदा शिंवेसरकरांनी अबिसिनियातून सिंहाचे काही छावे आणवले आणि थोडे मोठे होईपर्यंत त्यांचे पालन केल्यावर त्यांना ग्वाल्हेर आणि शिवपुरी या दरम्यानच्या मोहना जंगलात सोडले. काही दिवस त्यांनी आरण्यातल्या प्राण्यांवर निर्वाह केला,



पण नंतर ते गायी म्हशी मारू लागले. पुढे माणसांचीही शिकार करू लागले. त्या नंतर त्यांना पकडून श्योपूरच्या निर्जन वनात सोडण्यात आले. तेथे ते काही दिवस रमले, पण त्यांतील काही पुन्हा नरभक्षक झाले. सिंहाला दुसऱ्या अरण्यात नेऊन वसविणे खरोखरी कठीण आहे.

अलीकडेच जुनागढहून एक सिंह आणि दोन सिंहिणी आणून चंद्रप्रभा नदीच्या काठी चकिया नावाच्या अरण्यात सोडण्यात आले. रानातले प्राणी सोडून हे सिंह माणसांवर आक्रमण करू लागतील व त्यामुळे त्यांना गोळी घालावी लागेल, अशी चिंता नेहमीच व्यक्त करण्यात येते.

# बिबटया

मांजरीच्या परिवारातील बिबट्या किंवा बिबळ्या हा सर्वाधिक धूर्त, चाणाक्ष आणि दगाबाज कुटुंबीय आहे. त्याच्या अंगावरील ठिपके बिब्ब्यासारखे दिसतात, त्यामुळे बिबळ्या हे नाव पडले. हिंदीतील त्याचे गुलदार हे नाव अधिकच काव्यमय आहे, गुल म्हणजे फूल. फुलांनी मढवल्यासारखा शोभतो तो गुलदार! गुलबगहा आणि तेंदुआ अशीही त्याची नावे आहेत.


बिबटया सामान्यतः सर्वच देशांत आढळतो. आफ्रिकेत जेथे पटेरी वाघ आढळत नाहीत, तेथेही बिबटया सापडतो. बिबटयाचा भाऊबंद 'जेगुआर' दक्षिण अमेरिकेत सर्वत्र आढळतो. साइबेरिया सोडून जाशियाच्या उत्तरेकडील सर्व भागांत बिबटया आढळतो. फक्त अंदमान, जपान. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलँड, मादागास्कर आणि सहारा येथे मात्र बिबटया आढळत नाही. भारतात तर बिबटया सर्वत्र पसरलेला आहे. हिमालयात तो दोन हजार ते अडीच हजार मीटर उंचीपर्यंत आढळतो. बिबटया कोठेही असो, त्याची बैठक नेहमी उच्चासनावर असते.



बिबट्याचे शरीर सोनेरी असते. पोटाखाली पांढऱ्या पण वर सगळ्या बाजूला काळ्या रंगाच्या बुट्ट्या काढाव्यात तसे त्याचे शरीर दिसते. हातपाय, मान, डोके, शेपटी आणि पोटावरील बुट्टे काळेभोर आणि ठसठशीत असतात. आसाम आणि केरळ प्रांतात वर्षाकाठी अडीचशे सेंटिमीटरहून अधिक पाऊस पडत असल्यामुळे बिबट्याचा रंग तेथे काळा कुळकुळीत होऊन जातो. पण काळजीपूर्वक पाहिले तर काळ्या रंगाआडील बुट्ट्या स्पष्टपणे दिसून येतात. बिबट्याचा रंग आणि बुट्टी भोवतालच्या अरण्यात अशी काही मिसळून जाते की त्यामुळे इतर प्राण्यांच्या नजरेला तो चटकन पडत नाही. अरण्यात सूर्यकिरणांचे कवडसे बिबट्याच्या अंगावर पडतात, त्या



काळा बिबट्या




**बिबट्याचे ठिपके**

1 आणि 2 पोटावर; 3 पाठीवर; 4 मानेवर; 5 डोक्यावर; 6 मानेच्या वरच्या भागावर; 7 पाठीच्या कण्यावर; 8 शेपटीच्या उगमाशी; 9 आणि 10 पाठीच्या कण्याखाली खांद्याजवळ; 11 बरगड्यांजवळ; 12 पोटावर, बाजूच्या भागावर; 13 खांद्यावर



वेळी तो दबा धरून बसला आहे हे समजतच नाही. बिबट्या खरोखरी इतका देखणा प्राणी आहे की त्याच्या रेशमी शरीरावरून हात फिरवीत राहावे असे वाटते.

बिबट्याचे पाळीव मांजरीशी बरेच साम्य आहे. चपळ शरीर, नीरव गती, तीक्ष्ण कान, खरखरीत जीभ आणि अदम्य उत्साह या बाबतींत बिबट्या आपल्या सर्व कुटुंबीयांवर मात करतो. त्याच्या खांद्याची उंची 80 सेंटिमीटर असते. त्याचे खुंटी माप अडीच मीटर भरते. यातली शेपटीची लांबी 75 सेंटिमीटर. त्याचे वजन 91 किलोपर्यंत भरते. मादी आकाराने लहान आणि वजनात हलकी असते.



रागात

मादीला एका वेळी बहुधा तीन-चार छावे होतात. प्राणिसंग्रहालयात असे आढळून आलेले आहे की मादी सुमारे तीन महिने गर्भ धारण करते. जन्मानंतर जवळ जवळ वीस दिवसांनी छाव्यांचे डोळे उघडतात. कधी कधी नरही छावे सांभाळण्यात मादीला मदत करतो. आई छाव्यांना शान्त आणि निर्जन स्थळी वाढविते व कोणालाही आसपास फिरकू देत नाही. त्यांच्या मानेवरील कातडी दातांनी पकडून आई त्यांचे स्थलान्तर करते.

बिबट्याचे पंजे मांसल असतात. समोरच्या पायाला पाच आणि मागच्या पायाला चार नखे असतात. चालताना बिबट्या आपली नखे मांसल पंजात ओढून घेतो. बिबट्याची अठरा नखे म्हणजे जणू अठरा चाकूच. त्याच्या पंजात सापडलेले जनावर निसटू शकत नाही, बिबट्या आपली नखे झाडावर घासून धारदार ठेवतो. त्याचे घाऱ्याहिरव्या रंगाचे बुबुळ वर्तुळाकृती असते. मांजरीसारखे उभट नसते. विजेरीच्या प्रकाशात त्याचे डोळे स्फुल्लिंगासारखे तेजाळून उठतात. बिबट्याला प्रखर प्रकाशाची भीती वाटते. त्यामुळे चांगलेच अंधारून आल्यावर—पण वाघ घळीतून निघण्याच्या एक-दोन तास आधी—तो शिकार शोधायला बाहेर पडतो. तो वाघ आणि सिंह यांच्याप्रमाणे गर्जना करीत नाही तर गुरगुरतो. त्याचा हा आवाज लाकडावर करवत चालावी तसा भासतो. नराला बोलावण्यासाठी मादी असाच आवाज करते. तो आपला राग शिंकून व्यक्त करतो आणि छाव्यांना रागावताना सापासारखा फुत्कारतो.

मांजरीप्रमाणेच बिबट्याही झाडांवर आणि घराच्या छपरावर सहज चढून जातो. भक्ष्य ठार केले की तो ते बहुधा झाडाच्या फांद्यांत लपवून ठेवतो. बिबट्याला पाण्याचे फार भय वाटते व तो आपल्या अंगावर पाण्याचा एक थेंबही पडू देत नाही. वाघा-प्रमाणेच बिबट्याचेही कान पंचज्ञानेन्द्रियांत सर्वांत अधिक तीक्ष्ण असतात. त्यानंतर क्रम लागतो दृष्टीचा आणि अखेर गंधाचा. अंग चोरण्याची बिबट्याला चांगलीच सवय असते. जरुरीच्या वेळी अगदी छोट्यात छोट्या जागी सुद्धा बिबट्या सहज



'भोला' नावाचा काळा बिबळ्या



गजामधील अवघ्या 15 सें. मी. अंतरावरून भोला पसार झाला.

दबा धरून बसू शकतो. दिल्लीच्या प्राणिसंग्रहाल्यातील भोला नावाच्या बिबट्याने अवघे पंधरा सेंटिमीटर अंतर असलेल्या लोखंडी गजातून आपली सुटका करून घेतली होती !

बिबट्याला खायला सर्वच प्राणी चालतात. पण त्याला विशेष चविष्ट वाटते ते कुत्र्याचे मांस. कधी कधी तर तो निजलेल्या माणसाच्या खाटेखालील कुत्राही सफाईने पळवितो, वाघाने लपविलेले भक्ष्य चोरून फस्त करून पळ काढावा हा त्याचा नेहमीचाच उद्योग. माणसाची थोडीशी जरी चाहूल लागली तरी बिबट्या भुकेची पर्वा न करता पळून जातो; आणि परत तेथे येण्याचा धोका पत्करीत नाही, बिबट्याचे खाणे वाघासारखे नेटके नसते. तो मचमच करीत खातो. खाण्याची पद्धत पाहूनच भक्ष्य वाघाचे की बिबट्याचे ते समजते. वाघाप्रमाणेच त्याची जीभ वरच्या बाजूला वस्तऱ्यासारखी धारदार तर खालच्या बाजूला मखमलीसारखी मऊ असते.

बिबट्या आपल्या शिकारीवर उडी मारीत नाही तर विजेसारखा कोसळून पडतो. त्याच्या धूर्तपणाला खरोखरी सीमा नसते. त्यामुळेच नरभक्षक बिबट्या पकडणे फार कठीण जाते. गढवाल प्रांतातील रुद्रप्रयाग येथे एक नरभक्षक बिबट्या होऊन गेला. त्याने उणी पुरी आठ वर्षे शिकाऱ्यांना चकविले व सुमारे सव्वाशे माणसे फस्त केली. अखेर प्रसिद्ध शिकारी जिम कॉरबेट यांनी कित्येक महिने धावपळ करून त्याला मारले.

मचानावर बसलेला शिकारी वाघापासून सुरक्षित असेल, पण त्याला बिबट्याचे भय बाळगावेच लागते. बिबट्याला हत्तीचीसुद्धा भीती वाटत नाही. हत्तीची चाहूल लागल्याबरोबर उंच गवतात दबा धरावा आणि संधी येतांच त्याच्यावर झडप घालावी हे त्याचे तंत्र असते. जखमी बिबट्या म्हणजे तर प्रत्यक्ष यमराजच. जखमी बिबट्याच्या शोधात असंख्य शिकाऱ्यांनी आपले प्राण गमावलेले आहेत. जखमी वाघ शोधणे हे जखमी बिबट्या शोधण्यापेक्षा सोपे असते; पण बिबट्याने केलेल्या जखमेपेक्षा वाघाच्या हल्ल्याने झालेली जखम अधिक प्राणघातक असते. बिबट्याने जखमी केलेल्यांपैकी अनेक लोक जिवंत राहातात, पण वाघाने घायाळ केलेल्यांपैकी क्वचितच कोणी वाचत असेल.



एकदा गढवालचे प्रसिद्ध शिकारी मुकुन्दीलाल बारावा बिबट्या मारायला गेले असता बिबट्यानेच त्यांना साक्षात मृत्यूचे दर्शन घडविले. त्याचे असे झाले की एक बिबट्या टेहरी शहरातील एका गल्लीत घुसला आणि त्याने एक गाढव मारले. मुकुन्दीलाल बंदूक घेऊन बिबट्याची वाट पाहात दडून बसले. सायंकाळी जेव्हा ते गाढव खाण्यासाठी बिबट्या परत आला, त्या वेळी मुकुन्दीलाल यांनी गोळी घातली पण ती निसटती लागली. त्यामुळे केवळ जखमी होऊन बिबट्या पळून गेला. दुसऱ्या दिवशी त्याचा

माग काढीत मुकुन्दीलाल जुन्या राजवाड्याच्या बगीच्यापर्यंत गेले. झाडावर दगडांचा वर्षाव केल्यावर बिबट्या बाहेर निघाला. मुकुन्दीलाल यांनी गोळी झाडली. पण याही वेळी नेम चुकला व बिबट्या पुनश्च झाडीत जाऊन लपला. चोहीकडील छपरांवर जमलेले लोक आरोळ्या देत होते आणि झाडीवर दगड फेकत होते. दुसऱ्यांदा बिबट्या बाहेर निघाला त्याही वेळी मुकुन्दीलाल यांची गोळी वाया गेली, बिबट्याने एकाच झडपेत मुकुन्दीलाल यांना गाठले. त्याने पहिल्यांदा उजव्या खांद्यावर आणि मग पायांवर हल्ला केला, मुकुन्दीलाल यांच्या हातातील बंदूक आता रिकामी झालेली होती. तरीही तिचा काठीसारखा उपयोग करीत ते आपला बचाव करू लागले. अखेर बंदुकीचा दस्ता त्यानी बिबट्याच्या मस्तकावर इतक्या जोरात मारला की बिबट्याचे डोके आणि बंदुकीचा दस्ता दोन्हीचा निकाल लागला. बिबट्याचे ते धूड तेथेच कोसळले, बिबट्या आणि माणूस यांची ही कुस्ती सर्व लोक छतांवरून पाहात होते. मुकुन्दीलाल यांना या प्रसंगानंतर कित्येक महिने दवाखान्यात काढावे लागले.

धूर्तपणाच्या बाबतीत बिबट्याची बरोबरी दुसरा कोणताही प्राणी करू शकणार नाही. शिकाऱ्याचा कानोसा लागूच देत, तो बेपत्ता झालाच म्हणून समजा. आपल्या जंगलात बिबट्यांची संख्या वाघांपेक्षा पुष्कळच जास्त आहे. पण शिकाऱ्यांच्या हाती बिबट्या क्वचितच लागतो. दोनतीन वाघांमागे एक बिबट्या असे शिकारीचे प्रमाण पडते. बिबट्याच्या हुशारीच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. कित्येकदा शिकाऱ्याच्या घरासमोरून तो जनावर अलगद उचलून नेतो आणि बंदुकीच्या चापावर बोट ठेवलेला शिकारी त्याची वाटुली पाहात तसाच डोळे शिणवीत बसून राहतो!

सामान्यतः बिबट्या माणसाच्या नजरेपासून दूर राहतो. पण कधी कधी जंगलातल्या रस्त्याच्या चौकावरही येऊन बसतो. 1967 च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी एक बिबट्या केरळमधील मतदानकेंद्रावर असा उभा राहिला की जणू त्याला मतदानच करावयाचे होते! बहराईचच्या अरण्यातील विश्रामगृहात बिबट्याने एका खोलीत अख्खा पावसाळा काढला. गमतीची गोष्ट अशी की एक साहेब रात्री त्याच

बंगल्यात उतरले. दुसऱ्या दिवशी बिबट्या फार प्रयत्न करून हाकलावा लागला. बिबट्याचे छावे सहजगत्या पाळता येतात. पण असे करणे म्हणजे संकट विकत घेणेच आहे. कारण, तो माणसाबरोबर वर्षापेक्षा अधिक काळ राहू शकत नाही.

आपल्या देशात बिबट्याचे आणखी दोन भाऊबंद आढळतात. यांपैकी एक आहे 'बर्फी बिबट्या'. यालाच 'बर्फी गुलदार' किंवा 'हिम तेंदुआ' असेही म्हणतात. हा काश्मीर आणि हिमाल्याच्या पश्चिमेकडील रांगांत 3,300 मीटरच्या उंचीपर्यंत आढळतो. हा देशी बिबट्यापेक्षा लहान असतो. ह्याची लांबी सव्वा दोन ते पावणे तीन मीटर असते आणि वजन 33 ते 41 किलोपर्यंत भरते. ह्याची शेपटी बरीच लांब–एक मीटरपेक्षा थोडी जास्तच–असते. ह्याच्या खांद्याची उंची 75 सेंटिमीटर असते. ह्याच्या शरीराचा रंग मातकट पांढरा असतो आणि त्यावर अस्पष्ट काळे ठिपके असतात. या रंगामुळे तो पर्वतावर बर्फ असो किंवा नसो, नजरेत भरत नाही. त्याला लोखंडी खिळ्यांच्या सापळ्यात पकडले जाते. बर्फी बिबट्याचे




होतो. म्हणूनच त्याला हिंदीत 'बादली गुलदार' म्हणतात. लहानपणी हे बुट्टे छोटे असतात व वाढत्या वयावरोबर मोठे होत जातात. त्याची खांद्यापर्यंतची उंची ऐंशी सेंटिमीटर व लांबी दीड त पावणे तीन मीटर असते. यांतील शेपटीची लांबी एकसष्ट ते नव्वद सेंटिमीटर भरते. त्याचे वजन सतरा ते तेवीस किलो असते. त्याचे पाय इतर बिबट्यांपेक्षा वजनी असतात आणि पंजे दाट व सपाट असतात. बोर्निओतील लोक तर त्यांची कुंडले करतात.



बंगल्यात उतरले. दुसऱ्या दिवशी बिबट्या फार प्रयत्न करून हाकलावा लागला. बिबट्याचे छावे सहजगत्या पाळता येतात. पण असे करणे म्हणजे संकट विकत घेणेच आहे. कारण, तो माणसाबरोबर वर्षापेक्षा अधिक काळ राहू शकत नाही.

आपल्या देशात बिबट्याचे आणखी दोन भाऊबंद आढळतात. यांपैकी एक आहे 'बर्फी बिबट्या'. यालाच 'बर्फी गुलदार' किंवा 'हिम तेंदुआ' असेही म्हणतात. हा काश्मीर आणि हिमालयाच्या पश्चिमेकडील रांगांत 3,300 मीटरच्या उंचीपर्यंत आढळतो. हा देशी बिबट्यापेक्षा लहान असतो. ह्याची लांबी सव्वा दोन ते पावणे तीन मीटर असते आणि वजन 33 ते 41 किलोपर्यंत भरते. ह्याची शेपटी बरीच लांब–एक मीटरपेक्षा थोडी जास्तच–असते. ह्याच्या खांद्याची उंची 75 सेंटिमीटर असते. ह्याच्या शरीराचा रंग मातकट पांढरा असतो आणि त्याबर अस्पष्ट काळे ठिपके असतात. या रंगामुळे तो पर्वतावर बर्फ असो किंवा नसो, नजरेत भरत नाही. त्याला लोखंडी खिळ्यांच्या सापळ्यात पकडले जाते. बर्फी बिबट्याचे






बर्फी बिबळ्याचे पहाडी निवासस्थान



**बर्फी बिबळ्या**

कातडे फार मूल्यवान असते कारण त्यावरील केस लांब असतात आणि त्याचा स्पर्श रेशमासारखा मुलायम असतो.

'सावळा बिबळ्या' हा देशी बिबळ्याचा आणखी एक भाऊबंद. तो हिमालयाचा पूर्व भाग, आसाम, सिक्कीम आणि नेपाळ येथे आढळतो. त्याचे वास्तव्य घनदाट अरण्यांतील वृक्षांवर असते. त्याचा रंग गव्हाळ आणि खाकी असतो. डोके, हात, पाय आणि शेपटी यांवर ठसठशीत काळे ठिपके असतात. शरीरावरील ठिपके मात्र उभट चौकोनी आकाराचे असतात व त्यामुळे अनेकदा ते पट्टेच असल्याचा भास



सावळा बिवळ्या

सावळा बिबट्या तसा अनाकर्षक प्राणी आहे. पण तो पाळणे सोपे असते. खेळण्यात तो आपले मन रमवतो. झाडावरून उडी मारून हरीण, डुक्कर, माकड, बकरी इत्यादींची शिकार करतो. मादी एका वेळी सामान्यत: दोन छावे विते. ती त्यांना झाडांच्या ढोलीत किंवा गुहेत लपवून वाढविते.

सावळया बिबटयाला जेवताना त्रास दिला तरच तो माणसावर हल्ला करतो; एरवी





जेगुआर

नाही. अलीकडेच एक सावळा बिबट्या दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयात आणून ठेवलेला आहे.

बिबट्याचा 'जेगुआर' हा निकटचा आप्त आहे. पण तो आपल्या देशात आढळत नाही. तो असतो अमेरिकेत. आपल्या बिबट्यापेक्षा मोठा आणि वजनी असतो. बिबट्याप्रमाणे जेगुआरला पाण्याची भीती वाटत नाही व तो मजेत पोहू शकतो. पण तो पाळणे बिबट्यापेक्षा कठीण असते.

# चित्ता

चित्त्याची जातकुळी मांजरीचीच असली तरी त्याचे रूप मांजरीपेक्षा कुत्र्याशीच जास्त जुळते. त्याचे पाय कुत्र्यासारखेच लांब असतात. शरीररचनेप्रमाणेच स्वभाव व राहणी या बाबतीतही त्याचे आपल्या भाऊबंदांशी कसलेच साम्य नाही. चित्त्याचे दोन प्रकार आहेत. आफ्रिकेच्या मोकळ्या मैदानी जंगलांत आढळणारा चित्ता आणि आमच्या देशांतला चित्ता एकच आहेत.

चित्ता बिबटयापेक्षा उंच असतो. त्याचे खुंटी माप दोन ते अडीच मीटर आणि शेपटी 60 ते 75 सेंटिमीटर भरते. त्याच्या खांद्यांची उंची एक मीटर आणि वजन पन्नास ते पासष्ट किलो असते. चित्ते गर्भात सुमारे 90 दिवस राहातात. एका वेळी दोन ते चार छावे जन्माला येतात.

चित्त्याचा रंग आणि शरीरावरील टिपके बिबटयासारखेच असतात. फरक एवढाच की त्याचे टिपके गडद काळ्या रंगाचे असतात. चित्त्याच्या पिल्लांचे शरीर जन्मतः



भुरकट पिवळ्या रंगाचे असते आणि ती मोठी होऊ लागतात, तसतसे ठिपके अधिक स्पष्ट होऊ लागतात. शारीरिक प्रमाणाचा विचार केला तर चित्त्याचे डोके लहानसे असते आणि चेहरा चपटा असतो. डोळ्याच्या कडांतून नाकाच्या बाजूने जबड्याच्या टोकापर्यंत आलेल्या दोन काळ्या रेषा अशा दिसतात की जणू अश्रूंचा



मार्गच ! त्याचे कान छोटे आणि बुबुळे गोल असतात. त्याचे केस राठ व मान गुबगुबीत असते. नखावरील आवरण अपुरे असते आणि ती त्याला मांजरीप्रमाणे पूर्णपणे आत ओढून घेता येत नाहीत. नखे अणकुचीदार करण्यासाठी झाडावर घासावी लागतात. चित्ता यासाठी सतत एकच झाड वापरतो. त्यामुळे चित्याला पकडण्यासाठी

जाळी किंवा सापळे त्या झाडाजवळच लावली जातात. चित्त्याचे दात आणि दाढा दोन्ही बिबट्यापेक्षा लहान असतात.

हिंस्र दृष्टी हे चित्त्याचे सर्वांत प्रमुख आयुध आहे. त्याची दृष्टी अत्यंत तीक्ष्ण असते पण त्या मानाने घ्राणेंद्रिय व श्रवणेंद्रिय ही दुबळी असतात. बिबट्या फक्त रात्री शिकार करतो तर चित्ता दिवसा सूर्यप्रकाशात शिकारीला बाहेर पडतो.

चित्त्यापेक्षा अधिक वेगाने धावणारा दुसरा प्राणी नाही. हरीण, चितळ यासारख्या प्राण्यांचा पाठलाग सहा-सात किलोमीटर करून त्यांना थकवावे आणि नंतर उडी मारून ठार करावे असे त्याचे तंत्र असते. चित्ता आरंभी चोरपावलांनी आपली शिकार शोधतो. शिकार गवसल्याबरोबर एकदम ताशी शंभर किलोमीटर वेगाने तो तुटून पडतो. आपले भक्ष्य क्षणार्धात ठार मारून तो तेथेच त्याचा फन्ना उडवितो. तो मारलेला प्राणी ओढून नेत नाही किंवा लपविण्याचाही प्रयत्न करीत नाही. तो मचमच करीत ओंगळवाण्या पद्धतीने जेवतो.

एके काळी आपल्या देशात चित्ता पश्चिमेच्या मैदानापासून मध्यभारतातल्या पठारापर्यंत आणि दक्षिण भारततही सापडत असे. चित्त्याची एक जोडी 1951 साली आंध्र प्रदेशात दिसली होती. हीच अखेरची नोंद.

आपल्या देशातील राजे महाराजे शिकारीसाठी हत्ती आणि कुत्रे यांच्याप्रमाणेच चित्तेही पाळीत असत. चित्त्यांचा शिकारीसाठी उपयोग करण्याची पुढील पद्धत प्रचारात होती; चित्त्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधून बैलगाडीतून अरण्यात नेले जाई. शिकार दिसल्याबरोबर त्याच्या डोळ्यांवरील पट्टी उघडीत. भक्ष्य दिसल्याबरोबर चित्ता वायु-वेगाने तुटून पडे व त्याचे नरडे फोडून जीव घेई. शिकारीचा थोडासा भाग बक्षीस म्हणून मिळाला की तो संतुष्ट हायचा. कारण त्याला लहानपणापासून तशी सवय लावलेली असे.



वेगाने धावणाऱ्या चित्त्याचे लालित्य विलक्षण प्रेक्षणीय असते, पण चालताना तो फार बेढब दिसतो. त्याचा स्वभाव सरळ, खेळकर असतो आणि त्याला शिकवताही चटकन येते. आपले आणि आपल्या मालकाचे नात्र तो चटकन लक्षात ठेवतो. चित्ता प्राणिसंग्रहालयात ठेवता येतो पण तेथे त्याची वीण फार कमी प्रमाणात होते.

# पाळीव आणि जंगली मांजर

मांजरीच्या सुमारे पंचवीस जाती आहेत. ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडीज, मादागास्कर आणि काही बेटे वगळली तर त्या जगभर आढळतात. मांजरीचा समावेश पाळीव प्राण्यात केव्हा आणि कोठे झाला, हे सांगणे कठीण आहे. पण एवढे मात्र खरे की फार प्राचीन काळापासून मांजरे पाळली जात असल्याचे निर्देश इतिहासात आहेत. आपल्या देशातील खेड्यांत आणि शहरांत मांजरांची वस्ती नेहमीच होती, असे दिसते. मांजरी अनेक रंगांच्या असतात. बदामी, काळ्या, पांढऱ्या, सोनेरी, भुऱ्या आणि करड्या रंगाच्या मांजरी नेहमीच दिसतात. पट्टेदार आणि ठिपकेदार मांजरी अरण्यात सापडतात.

सामान्यतः मांजरीची लांबी साठ सेंटिमीटर असते. शेपटीचा समावेश केला तर ही लांबी नव्वद सेंटिमीटर भरेल. नराचे वजन चार ते आठ किलो असते. मादीचे वजन नरापेक्षा दीड किलोने कमी भरते. मांजरीच्या खांद्यांची उंची वीस ते पंचवीस सेंटि-मीटर असते. दिवसा निजावे, रात्री शिकार करावी, चोरपावलांनी वावरावे, चाटून



शरीर साफ करावे आणि स्वच्छंदी आयुष्य घालवावे हा मांजरीचा सहजस्वभाव होय. रंग, रूप आणि आकार जातिगणिक वेगळा असला तरी मांजरीचा स्वभाव मात्र सर्वत्र सारखाच असतो.

मांजरीच्या पुढील पंजांत पाच आणि मागील पंजांत चार नखे असतात. ती चालताना आपली नखे मांसल पंजांत ओढून घेते. तिचे डोळे मोठे आणि कान उभे असतात. तोंड मात्र चपटे असते. तिची बुबुळे गोल नसतात तर उभट असतात. मांजर वाटेल ते खाते, छोट्या चिमण्या, खारीं आणि उंदीर तर जणू मांजरीसाठीच उत्पन्न झालेले आहेत. मांजर पाण्याजवळ जाण्याचे टाळते. ती माणसावर कधीच हल्ला करीत नाही. अचानक पाय पडला तर ती चावते किंवा पंजा मारते.


घरगुती मांजर स्वच्छंदी वर्तनासाठी प्रसिद्ध आहे. ती शेपटी ताठ करून मालकाला



जेवण मागते. 'म्याऊं-म्याऊं' करते, मालकाच्या पायावर आपले शरीर लडिवाळपणाने घासते पण खाणे-पिणे झाल्यावर आल्या रस्त्याने चालती होते. वस्तुतः मांजर हा घरगुती प्राणी आहे, पण पाळीव मात्र नाही. तिला प्रेम असते ते घराशी, मालकाशी नव्हे. मांजरीला जवळपास कोठेही नेऊन सोडा, ती आपले घर शोधीत परत आलीच म्हणून समजा.

इंग्लंडचे भूतपूर्व प्रधान मंत्री लॉइड जॉर्ज यांनी मांजरीची एक विलक्षण कथा नमूद केलेली आहे. एकदा महात्मा गांधी त्यांना भेटायला गेले होते. महात्माजी त्यांच्या दिवाणखान्यात जाऊन बसल्याबरोबर एक मांजर बाहेरून आली आणि त्यांच्या मांडीवर जाऊन बसली. महात्माजींचा वार्तालाप चालू असेपर्यंत ती त्यांना बिलगून होती. त्यांनी निरोप घेतला तेव्हा मांजरही खोली सोडून निघून गेली. लॉईड जॉर्ज

**जंगली मांजर**



म. ग्रं.
दा. क्र. १८८८५
दि.

*लिहितात की महात्माजींच्या मांडीवर बसण्यासाठीच जणू ती मांजर आलेली* होती. कारण त्यांनी पूर्वी कधी तिला पाहिले नव्हते. ती कोठून कशी आली हा त्यांनाही प्रश्नच होता.

मांजर वर्षातून दोनदा विते. तिला एका वेळी सामान्यतः चार-पाच पिले होतात, पण त्यांतली सरासरी दोनच जगतात. जन्मतः त्यांचे डोळे बंद असतात व ते पंधरा दिवसांनी उघडतात. पिलांचे पालनपोषण आईच करते. बोका पिलांच्या जवळपास फिरकत नाही आणि कधी कधी तर त्यांना ठार करून खाऊन टाकतो. त्यामुळे त्यांची आई त्यांना मानेशी दातांत अलगद धरून एका जागेहून दुसऱ्या जागी लपवीत फिरते. आपल्या अपत्यांचा प्रतिपाळ तीन महिने केल्यावर 'ती आणि त्यांचे नशीब' अशा वृत्तीने मांजर त्यांचा त्याग करते. मांजरीची आयुर्मर्यादा सुमारे पंचवीस वर्षे असते.

वेगवेगळ्या देशांतल्या मांजरी विभिन्न आकाराच्या असतात. यांपैकी इराणची केसाळ निळी पर्शियन आणि सयामी या सुप्रसिद्ध आहेत.

जंगली मांजरींच्या अनेक जाती आहेत. पाळीव मांजरीपेक्षा त्यांचा आकार मोठा असतो. नेपाळ आसामांतली एक जात तर हुबेहूब सावळ्या बिबट्यासारखी दिसते. तिथल्या अरण्यांतली सोनेरी मांजर खरोखरी सुंदर आणि लोभसवाणी असते. मांजरीची स्मरणशक्ती फारच दुबळी असते आणि तिला फसवले, इजा केली किंवा संकटात घातले तरी ती ते लवकरच विसरते. तुमचा पाय एखाद्या मांजरीवर पडला तर ती चावून आपली सुटका करून घेईल व पळून जाईल. पण थोड्याच वेळात परत येऊन जेवणासाठी लाडीगोडी लावेल.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा
दा. क्र. १८५५५ नों दि.
वि. आद्र ११

लिहितात की महात्माजींच्या मांडीवर बसण्यासाठीच जणू ती मांजर आलेली होती. कारण त्यांनी पूर्वी कधी तिला पाहिले नव्हते. ती कोठून कशी आली हा त्यांनाही प्रश्नच होता.

मांजर वर्षातून दोनदा विते. तिला एका वेळी सामान्यत: चार-पाच पिले होतात, पण त्यांतली सरासरी दोनच जगतात. जन्मत: त्यांचे डोळे बंद असतात व ते पंधरा दिवसांनी उघडतात. पिलांचे पालनपोषण आईच करते. बोका पिलांच्या जवळपास फिरकत नाही आणि कधी कधी तर त्यांना ठार करून खाऊन टाकतो. त्यामुळे त्यांची आई त्यांना मानेशी दातांत अलगद धरून एका जागेहून दुसऱ्या जागी लपवीत फिरते. आपल्या अपत्यांचा प्रतिपाळ तीन महिने केल्यावर 'ती आणि त्यांचे नशीब' अशा वृत्तीने मांजर त्यांचा त्याग करते. मांजरीची आयुर्मर्यादा सुमारे पंचवीस वर्षे असते.

वेगवेगळ्या देशांतल्या मांजरी विभिन्न आकाराच्या असतात. यांपैकी इराणची केसाळ निळी पर्शियन आणि सयामी या सुप्रसिद्ध आहेत.

जंगली मांजरींच्या अनेक जाती आहेत. पाळीव मांजरीपेक्षा त्यांचा आकार मोठा असतो. नेपाळ आसामांतली एक जात तर हुबेहूब सावळ्या बिबट्यासारखी दिसते. तिथल्या अरण्यांतली सोनेरी मांजर खरोखरी सुंदर आणि लोभसवाणी असते. मांजरीची स्मरणशक्ती फारच दुबळी असते आणि तिला फसवले, इजा केली किंवा संकटात घातले तरी ती ते लवकरच विसरते. तुमचा पाय एखाद्या मांजरीवर पडला तर ती चावून आपली सुटका करून घेईल व पळून जाईल. पण थोड्याच वेळात परत येऊन जेवणासाठी लाडीगोडी लावेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७९९४० ... दि.
क्रमांक ... नोंद दि.

# या मालेची प्रकाशित पुस्तके

| | |
|---|---|
| बापू (चित्रमय जीवन–दोन भागांत विभागून) | एफ० सी० फ्रीटास |
| काश्मीर | छायाचित्रकार : प्रेमानन्द शर्मा<br>लेखिका : माला सिंह |
| पक्षी-जगत | जमाल आरा |
| आमच्या नद्यांची कहाणी | लीला मजुमदार |
| हिमालयाच्या शिखरांवर | ब्रिगेडियर ग्यानसिंह |
| स्वर्गाची सहल व अन्य कहाण्या | लीलावती भागवत |
| सुरस कहाण्या | मनोज दास |
| स्वराज्याची कहाणी––भाग १ | विष्णू प्रभाकर |
| आपल्या आगगाड्यांची कहाणी | जगजीत सिंह |
| त्यांनी पाहिलेला भारत | के० सी० खन्ना |
| चला नाटक करू | उमा आनंद |

प्रत्येकी मूल्य रु० 1-50

ही पुस्तके इंग्रजी व इतर सर्व भारतीय भाषांत प्रसिद्ध होणार आहेत.

IRBK-0114675